# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.२०/०७/२०२२

## प्रेसनोट

### मा.मुख्यमंत्री यांचे निर्देशाप्रमाणे वाघराळपाडा दुर्घटनाग्रस्त कुटुंबाला महानगरपालिकेतर्फे रु.५ लाखांची मदत

दिनांक १३ जुलै, २०२२ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वाघराळपाडा, राजावली, नायगांव (पूर्व) येथील बैठ्या चाळीतील एका खोलीवर अतिवृष्टीमुळे दरड कोसळण्याची दुर्दैवी घटना घडली. या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील २ व्यक्ती मृत पावल्या व २ व्यक्ती जखमी झाल्या होत्या.

दुर्घटनेत जखमी झालेल्या व्यक्तींना (१.श्रीम.बंदना सिंग (वय ३४ वर्षे ) व २.कु.ओम सिंग, (वय ९ वर्षे)) महानगरपालिकेमार्फत आयएसीस हॉस्पिटल, वसई(पूर्व) या खाजगी रुग्णालयात तात्काळ उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. सदर व्यक्तींच्या आवश्यक त्या सर्व वैद्यकीय तपासण्या करून त्यांच्यावर दि.१३ जुलै ते १७ जुलै २०२२ या कालावधीत रुग्णालयात योग्य ते सर्वतोपरी वैद्यकीय उपचार करून सदर व्यक्ती पूर्णपणे बरे झाल्यानंतर त्यांना रुग्णालयातून डीस्चार्च देण्यात आला. सदर वैद्यकीय उपचाराचा संपूर्ण खर्च महानगरपालिकेतर्फे करण्यात आला आहे.

तसेच मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार महानगरपालिकेच्या नैसर्गिक आपत्ती निधीतून दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लाख रुपये व जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये अशी एकूण ५ लाख रुपयांची मदत करण्यात आली आहे. रुग्णालयातून डीस्चार्च मिळाल्यानंतर सदर कुटुंबातील व्यक्ती ह्या उत्तर प्रदेश येथील त्यांच्या गावी गेल्यामुळे त्यांना समक्ष धनादेश देणे शक्य नसल्यामुळे महानगरपालिकेमार्फत कुटुंबांतील व्यक्ती श्रीमती बंदना अमित सिंग यांच्या बँक खात्यामध्ये २ लाख रुपयांचे २ धनादेश व ५० हजार रुपयांचे २ धनादेश असे एकूण ५ लाख रुपयांचे धनादेश जमा करण्यात आले आहेत.

मुख्य कार्यालय विरार
वसई विरार शहर महानगरपालिका